माता रमाईचे भाषण

संकलन-संपादन : राजरत्न ठोसर

विनिमय प्रकाशन, मुंबई

माता रमाईचे अखेरचे भाषण :
रमाबाई भिमराव आंबेडकर

प्रथम आवृत्ती :
६ डिसेंबर २०१० (डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन)

प्रकाशक :
विनिमय प्रकाशन
राजरत्न ठोसर
उदयनगर, सुर्यनगर,
पोलीस स्टेशनच्या बाजूला,
एल. बी.एस.मार्ग, विक्रोळी (प.),
मुंबई -४०० ०८३.
मो. 9969198821
website : vinimaypublications.com

मुद्रक :
क्रोमा प्रिंटींग प्रेस
भांडूप, मुंबई

अक्षरजुळणी :
विनिमय प्रकाशन

किंमत :
१० रु.

प्रकाशकीय

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या पत्नी रमा म्हणजेच आपल्या आई, रमाई. अगदी लग्नापासूनच त्यांनी जणू समाजसेवेचे कंकणच आपल्या हातात घातले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केलेल्या चळवळीत रमाईंचा सुद्धा फार मोठा मोलाचा वाटा आहे. म्हणतात ना महापुरुषांना घडविण्यात स्त्रीचा मोठा सहभाग असतो अगदी तसाच पत्नी या नात्याने माता रमाचा भीमरावांना घडविण्यात मोठा मोलाचा वाटा आहे.

भीमराव परदेशात शिकत असताना त्यांनी सरपणाची ओझी डोक्यावर वाहून आणली. शेण्याच्या गोवऱ्याही थापल्या. केवळ अर्धी भाकरी, कधी कधी ती ही नाही अशा स्थितीत दिवस काढले. ते केवळ साहेबांनी खूप खूप शिकावं व खूप मोठं समाजकार्य करावं. साहेबांच्या कुटुंबाची साहेब परदेशात असताना झालेली दैन्यावस्था पाहून बऱ्याच समाजसेवकांनी रमाबाईंना पैसे देण्याची बोलणी केली, पण रमाबाईंनी कोणाचा छदामही स्विकारला नाही. रमाईचे सारे जिवन उदात्ततेने, त्यागाने, कष्टाने भरलेले आहे. रमाई म्हणजे आदर्श गृहिणी, कर्तव्यदक्ष व प्रेमळ पत्नी. तसेच त्या महिला मंडळाच्या अध्यक्षा होत्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर खूप शिकलेले होते आणि रमाई मात्र काहीच नाही असं काही लोक बडबडताना दिसतात. पण ते असत्य आहे. रमाईंना लिहायला व वाचायला स्वतः बाबासाहेबांनीच शिकविलेले होते. तसे पाहिले तर संसाराचा गाडा हाकताना रमाईंना भाषण करायला वेळ कुठे होता. परंतु तरीही रमाईंनी उभ्या आयुष्यात दोन भाषणे केली.

रमाईंनी सुद्धा भाषणे केली आहेत याची माहिती मी काही हितचिंतकांना दिली. तेव्हा त्यांनी मला हे छोटेसे पुस्तक प्रकाशीत करण्याविषयी त्यांची इच्छा प्रकट केली व नंतर मी हे पुस्तक प्रकाशीत करण्याचे ठरविले.

परंतु इतर पुस्तकांच्या मानाने हे पुस्तक खूपच छोटे असल्याने पुन्हा अडचण निर्माण झाली. परतुं छोटेसे का होईना ते सर्वांनी वाचावे असा रमाईंच्या भाषणाचा दुर्मिळ ठेवा आहे म्हणून पुस्तक प्रकाशीत करण्याचा आनंद द्विगणीत झाला.

प्रस्तुत पुस्तकात माता रमाईचे महिला मंडळातील पहिले भाषण व त्यांचे मुंबई बंदरावर शेकडो श्रोत्यांसमोर केलेले अखेरचे भाषण आणि त्याच ठिकाणी रमाईंच्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले भाषण दिलेले आहे. वाचक वर्ग या छोट्या पुस्तकाचेही स्वागत करतील हीच अपेक्षा!

विनिमय प्रकाशन

माता रमाईचे महिला मंडळातील पहिले भाषण

दिवस उजाडला. मोठ्या उत्साहात, जोमात. आज रमाआई समाजात प्रथमच भाषण करणार होत्या. त्यांनी सर्व घरकाम लवकर आटोपले. संध्याकाळ झाली. तेवढ्यात, महिला मंडळातील दोन महिला कार्यकर्त्या रमाईंना नियुक्त सभा मंडपाकडे घेऊन जाण्यासाठी आल्या. देवाच्या, मामजींच्या (रामजीबाबांच्या) व पतिदेवाच्या प्रतिमेला नमस्कार करुन रमाई भाषणाला निघाल्या. त्यांनी बोलण्याची चांगली तयारी केली होती. रमाईंनी भाषणाला सुरुवात केली.

''माझ्या प्रिय माता आणि भगिनींनो!

आज मी प्रथमच सभेत बोलायला उभी आहे. तेव्हा बोलताना काही चुकलं माकलं तर सांभाळून घ्या. आपण व्यवहारात नित्य पाहतो की, पतीनं ज्या कार्याची धुरा आपल्या खांद्यावर घेतलेली असते, त्याच धुरेला सहधर्मचारिणी म्हणून पत्नीनंसुद्धा खांदा लावायचा असतो. तसाच काहीसा प्रकार आज माझ्या बाबतीत घडला आहे असं मला वाटतं.

(जनसमुदायात टाळ्यांचा कडकडात होतो)

माझ्यासारख्या विवाहित स्त्रीला पतीसेवेशिवाय या जगात दुसरं काही आपलं सेवाकर्तव्य आहे, याची जाणीव या क्षणापर्यंत तरी मला नव्हती. पण आज अशी भव्य मंचावर उभी राहून, एवढ्या मोठ्या जनसमुदायाकडे पाहताना, मला वाटू लागलयं – ' शहाणे करूनी सोडावे सकलजन!...'

(श्रोत्यांमधून उत्स्फूर्त टाळ्यांचा प्रचंड गजर व घोषणा... 'मातोश्री रमाबाईसाहेब आंबेडकर की जय!')

'माझा असा जयजयकार करु नका. हो, अजून मी तुमच्याविषयी कसलचं कर्तव्य केलं नाही. त्याची आता मला लाज वाटते. असो. आपल्या साऱ्यांचे पुढारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटते की, आम्ही स्त्रियांनी असं पुढं आलं पाहिजे. समाजाच्या या क्रांती-चळवळीत, वर उठण्याच्या धडपडीत आम्ही स्त्रियांनी भाग घेतला पाहिजे. कारण, स्त्रिया एकनिष्ठ असतात. कोणत्याही चळवळीला स्त्रियांचा सहभाग पाहिजे. त्याशिवाय चळवळीचं दल पुढे सरकत नाही. छावणी हालत नाही.'

(श्रोत्यांमधून परत टाळ्यांचा एकच कडकडाट....)

जगातल्या क्रांतीचळवळी कशावर चालतात? त्यागावर... पडेल त्या त्यागावर.... अशा चळवळीच्या लोकांना कसल्याही अग्निदिव्यातून जावं लागतं, त्याशिवाय इच्छित श्रेयाचं सुवर्ण त्यांच्या हाती लागत नाही. यासंबंधी एकदा मला डॉ. आंबेडकरांनी सांगितलेली गोष्ट आज मी तुम्हाला सांगणार आहे. ग्रीक पुराणातील ही गोष्ट आहे.

डिमेटर नावाची एक देवता, मनुष्यरुप धारण करुन पृथ्वीतलावर उतरली. तिला इथल्या एका राणीनं आपलं तान्हं मूल सांभाळण्यासाठी आपल्या राजवाड्यात नोकरीस ठेवलं. राणीच्या त्या लहान मुलाला 'देव' बनवावं, अशी त्या देवतेला इच्छा झाली. म्हणून ती रोज रात्री सारी मंडळी झोपली की सारी दारे-खिडक्या बंद करी. त्या मुलाला

पाळण्यातून बाहेर काढी आणि त्याचे अंगावरील कपडे उतरवून, ती देवी त्याला जळत्या निखाऱ्यावर ठेवी. हळूहळू निखाऱ्यांची धग सहन करण्याचे सामर्थ्य त्या मुलामध्ये उत्पन्न होऊ लागले. त्याचे बळ वाढू लागले. त्याच्यामध्ये अत्यंत तेजस्वी असा दैवी अंश विकसित होऊ लागला. पण एका रात्री त्या मुलाची आई एकाएकी त्या खोलीत शिरली. तिच्या दृष्टीस तो सारा प्रकार पडताच, ती भयंकर संतापली. तिनं आपलं मूल चटकन् निखाऱ्यावरुन उचललं. अर्थात राणीला तिचं ते मूल मिळालं. पण त्या मुलाचा सामर्थ्यशाली 'देव' जो होणार होता, त्या देवाला मात्र ती मुकली!...

ही गोष्ट सांगायचं तात्पर्य एवढचं की, असं विस्तवातून गेल्याशिवाय देवपणा येत नाही. अग्नी हा माणसाला शुद्ध करतो आणि त्याचं बळ वाढवितो. म्हणून अस्पृश्य माणसाला हालअपेष्टांच्या आणि त्यागाच्या अग्नीदिव्यातून गेल्याशिवाय, त्यांचा उद्धार होणार नाही. तुम्ही स्वतःला अस्पृश्य-हीन मानू नका. घरी स्वच्छता ठेवा. तुमच्या मुलींना शिक्षण द्या. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा! त्याचा तिन्ही लोकी झेंडा...' अशी इच्छा मनात धरुन यापुढं आपली मुलं-मुली घडवायला शिका. त्यात आपला उद्धार आहे. एवढं बोलून मी माझं हे वाढलेलं भाषण पुरं करते."

(टाळ्यांचा प्रचंप गजर झाला. मातोश्री रमाबाई आंबेडकर की जय!)

माता रमाईचे मुंबई बंदरावरील अखेरचे भाषण

२९ जानेवारी १९३२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना घेऊन येणारी लंडनची बोट ठीक सकाळी ६.०० वाजता मुंबई धक्याला लागली नि साऱ्यांच्या हृदयात आनंदाचं उधाण आलं.

भल्या पहाटेपासून त्यांचे जवळचे इष्टमित्र, त्यांचे एकनिष्ठ अनुयायी, नातेवाईक व इतर हितचिंतक त्यांच्या आगमनाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत होते. प्रत्येकजण हातात शोभिवंत हार घेऊन, पहाटेच्या थंडीत तिष्ठत शांतपणे उभे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दर्शनार्थ तुफान गर्दी लोटली होती. त्या गर्दीतच त्यांची पत्नी सौ. रमाबाई आंबेडकर डोळ्यांत प्राण आणून आणि हातात सुगंधी फुलांचा हार घेऊन आपल्या पतिदेवाची वाट पाहत उभ्या होत्या. साहेबांना केव्हा एकदा डोळं भरुन पाहिन असं त्यांना झालं होतं.

तेवढ्यात बाबासाहेबांची पुण्यमय पावलं जमिनीला लागली. बाबासाहेबांना पाहताच जमलेल्या साऱ्यांनी मोठ्या उत्साहाने गगनभेदी घोषणा द्यावयास सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय! डॉ. आंबेडकर कोण आहे ? सात कोटी दलितांचा राजा आहे. डॉ. आंबेडकर अमर रहे!

प्रथम समता सैनिक दलाने त्यांना मानवंदना दिली. लगेच हार घालण्यासाठी त्यांच्या भोवती एकच गर्दी उसळली. बाबासाहेबांवरच्या आत्यंतिक भक्तीचे, प्रेमाचे आणि निष्ठेचे प्रतीक असे ते हार... बाबासाहेबांच्या गळ्यात पडत होते. या साऱ्या गर्दीपासून रमाआई दूरच उभ्या होत्या. आपल्या साहेबांवरील आपल्या लोकांचे ते अफाट प्रेम त्या प्रथमच पाहत होत्या. पाहता पाहता त्यांचे भाबडे डोळे आनंदातिशयाने पाझरु लागले.

रमाआईंनी सर्वात शेवटी बाबासाहेबांना हार घातला. तो हार घातला तोसुद्धा त्यांच्या पायतळी नजर लावूनच. रात्रंदिवस ज्या मूर्तीची सेवा-काळजी मनोभावे केली, त्या निकट मूर्तीकडे डोळे भरुन पाहण्यास त्यांची लज्जा व संस्कार परवानगी देत नव्हते जणू.

पण हे पवित्र हृदयंगम दृश्य जनता चे त्या वेळचे संपादक श्री. सहस्त्रबुद्धे यांच्या चाणाक्ष नजरेनं अचूक टिपलेलं होतं. आणि मग अभिनंदनाच्या सभेत सहस्त्रबुद्धे यांनीच अवचितपणे रमाईंना सगळ्यांच्या शेवटी साहेबांना हार घालण्याचं आणि तो हार गळ्यात घालत असताना, पायतळी बघण्याचं कारण काय असा प्रश्न विचारला.

पण रमाआईंना क्षणभर अवघडल्यासारखं झालं. सभेत बोलावं तर चांगलं बोलता येणार नाही, न बोलावं तर साहेबांची प्रतिष्ठा कमी होईल. तशा रमाआईसाहेब फार चतुर व शहाण्या होत्या.

क्षणात त्यांच्या अंगात वीज सळसळल्यासारखं झालं. त्या ताडकन् उठल्या नि सभेत बोलू लागल्या —

"अध्यक्ष महाराज, माझे पतीराज व जमलेल्या माझ्या बंधुभगिनींनो! आता सहस्त्रबुद्धेसाहेबांनी मला जे दोन प्रश्न टाकले आहेत. त्या दोन प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मी उभी आहे. साहेबांचं कधीतरी, क्वचितच ज्यांना दर्शन घडतं त्यांना प्रथम दर्शन घेऊ देणं, हे रात्रंदिवस साहेबांचं दर्शन घेऊन तृप्त झालेल्या मीचं सगळ्यांना दर्शन घेऊन, हार घालून होईपर्यंत थांबणं, माणुसकीचं, सौजन्याचं होतं. म्हणून मी सगळ्यात शेवटी साहेबांना हार घातला.
आपणास माहीत आहेसच की, डॉ. आंबेडकर साहेबांनी पददलितांच्या, गोरगरिबांच्या उद्धाराचे कंकण हाती बांधलेले आहे. त्यांची मी धर्मपत्नी आहे. त्या कंकणाला माझी नजर लागू नये, म्हणून साहेबांना हार घालताना माझी नजर खाली करुन त्यांच्या पायाकडे पाहत होते.

मी दिलेली उत्तरे बरोबर असतील व ती सहस्त्रबुद्धेसाहेबांना पटली असतील, अशी अपेक्षा करुन मी माझं भाषण पुरं करते.
(आणि प्रचंड टाळ्यांचा एकच कडकडाट झाला)

मुंबई बंदरावरील माता रमाईच्या भाषणानंतर बाबासाहेबांनी केलेले भाषण

गोलमेज परिषदेतील कामगिरीच्या यशाचा धनी मी नव्हे, त्या यशाचे धनी येथे जमलेले माझे असंख्य बंधू-भगिनीच सर्वस्वी आहेत. गोलमेज परिषदेतील माझी कामगिरी पाहिल्यावर हिंदूंची भावी पिढी - मी राष्ट्राची चोख कामगिरी बजावली -असाच निर्वाळा देईल. आता मी जास्त काही बोलत नाही. तथापी मघाच्या वक्त्या सौ. मोहितेबाईंनी सौ रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्याविषयी खूप सांगितलं. पण ह्यातलं काहीएक मला अजूनपर्यंत तुमच्या या आईसाहेबांनी सांगितलेलं नव्हतं. (हंशा!) तुमची आईसाहेब मोठ्या भाग्याची भागीरथी आहे हेही मला आजच कळलं. (हंशा!) बाकी आहे खरी भाग्याची भागीरथी!

(प्रचंड हंशा, टाळ्या नि गगनभेदी घोषणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय! सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर की जय!)

आमच्या विनिमय प्रकाशनाची १०० रु. पेक्षा जास्त किंमतीची उपलब्ध पुस्तके भारतात कोठेही पोस्टाने सहज घरपोच मागवा. आताच संपर्क करा : 9969198821